माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग

दुर.क्र.०२५३ २२३२७६४ पिनॅकल मॉल, चौथा मजला, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार दाखल द्वितीय अपील**

**क्रमांक : द्वितीय अपील -२१३/२०२४/अहमदनगर**

| द्वितीय अपील कर्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|
| रमेश गुलाबचंद बाहेती रा. इंद्रगुलाब, कारखाना रोड, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर ४२२६०१ | जनमाहिती अधिकारी, मॉर्डन हायस्कूल अकोले (उच्च माध्य), ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ | प्राचार्य, मॉर्डन हायस्कूल अकोले (उच्च माध्य), ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ |

**सुनावणीचा/आदेशाचा दिनांक : १७/५/२०२४**

अपिलार्थी यांनी दि.०५/०१/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही " असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे.

२. सदर द्वितीय अपिलाच्या सुनावणीस अपीलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी आणि तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित आहेत व अन्य पक्षकार अनुपस्थित आहेत .

३. अपिलार्थी यांनी दिनांक २८/०९/२०२३ च्या मूळ अर्जान्वये वर नमूद केलेल्या जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करून, दावा क्रमांक ५९६७/२०१३ संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मिळण्याची विनंती केली आहे.

क) २०१३-१४ मध्ये अनुदानित तत्वावर भौतिक विषय शिकविणाऱ्या शिक्षकाचे नाव.

ख) २०१४-१५ मध्ये अनुदानित व विना अनुदानित विभागात भौतिक विषय शिकविणाऱ्या शिक्षकाचे नाव.

४. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचा तपशील उपलब्ध नाही.

५. तसेच या प्रकरणात अपिलार्थी यांनी दिनांक ७/११/२०२३ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे अधिनियमाच्या कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले आहे. सदर प्रथम अपीलावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशील देखील उपलब्ध नाही.

६. सुनावणीदरम्यान, उपस्थित तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्राचार्य, मॉर्डन हायस्कूल अकोले (उच्च माध्य) यांनी असे नमूद केले की अपीलकर्ता हे शाळेकडे वारंवार माहिती अधिकारात अर्ज सादर करून माहितीची मागणी करतात. त्यांनी सन २०१२ पासून आजपर्यंत सादर केलेल्या १३५ माहिती अर्जाचा तपशील तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगास उपलब्ध करून दिलेला आहे. तसेच असेही स्पष्ट केले आहे की सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपबद्ध करून देण्यात आली आहे मात्र जास्त प्रमाणात माहिती अर्ज प्राप्त झाल्यास शाळेच्या शैक्षणिक कामावर विपरीत परिणाम होतो. श्री बाहेती यांनी सादर केलेल्या या प्रकरणातील अर्जाच्या बाबतीत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही असेही त्यांनी सुनावणीदरम्यान स्पष्ट केले.

७. अपीलकर्ता यांची एका शाळेकडे वारंवार अर्ज करून माहिती मागण्याची प्रवृत्ती पाहता, शाळा प्रशासनास वेठीला धरण्याचा आणि माहिती अधिकार कायद्याचा दुरुपयोग करण्याचा त्यांचा मानस स्पष्ट होतो. तसेच त्यांनी मागणी केलेल्या माहितीचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी काहीही संबंध असल्याचे किंवा त्यामुळे कोणतेही लोकहित साध्य होणार असल्याचे सिद्ध करण्यात अपीलकर्ता अपयशी ठरलेले आहेत.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

प्रस्तुतचे द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त, नाशिक खंडपीठ

आ-११३६

28 MAY 2024